महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ २३ सप्टेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक - ०९१ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत ०२ रुपये

# ठाणे मेट्रोची चाचणी यशस्वी

## ■ ठाण्यातील वाहतूक कोंडीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी मेट्रो महत्त्वाची भूमिका बजावेल - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, दि.22 :** ठाणे,दि.22(जिमाका):- मेट्रो 4 आणि मेट्रो 4 अ या मार्गिका वडाळा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल्सला जोडणाऱ्या मेट्रो 11 या मार्गिकेला जोडण्यात येणार असल्याने ही 58 किमी लांबीची देशातील सर्वात मोठी मेट्रो मार्गिका ठाणेकर आणि मुंबईकरांसाठी उपलब्ध होणार आहे. पुढच्या वर्षाच्या शेवटापर्यंत या मेट्रोचे सर्व टप्पे प्रवाशांकरिता खुले होतील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मेट्रो मार्ग 4 (वडाळा–कासारवडवली) व 4 अ (कासारवडवली–गायमुख) च्या टप्पा-1 गायमुख जंक्शन गायमुख गाव- घोडबंदर रोड- कासारवडवली- विजय गार्डन या मार्गिकेच्या प्राधान्य विभागावर तांत्रिक तपासणी व ट्रायल रनची सुरुवात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री तथा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (एमएमआरडीए) अध्यक्ष एकनाथ शिंदे, राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार नरेश

### मेट्रोचे सर्व टप्पे २०२६ च्या अखेरपर्यंत खुले होणार -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



म्हस्के, आमदार निरंजन डावखरे, माजी आमदार रवींद्र फाटक, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (एमएमआरडीए) महानगर आयुक्त डॉ.संजय मुखर्जी, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव नवीन सोना, कोकण विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी, ठाण्याचे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मेट्रो मार्ग 4 आणि 4 अ बद्दल माहिती देताना म्हणाले की, घाटकोपर-मुलुंड -गायमुख या मेट्रो मार्गिकेची एकूण लांबी 35 किलोमीटर असून मेट्रो 4 ची 32 कि.मी. आणि मेट्रो 4 अ ची 2.88 कि.मी. आहे. मार्गिकेत एकूण 32 स्थानके असून या प्रकल्पासाठी 16 हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. मेट्रो 4, मेट्रो 4 अ, मेट्रो 10 आणि मेट्रो 11 या सर्व मेट्रोसाठी डेपो तयार करण्याकरिता मोघरपाडा येथे 45 हेक्टर जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या मेट्रो मार्गिकेचा विशेष फायदा असा आहे की, पूर्व उपनगरे, पश्चिम उपनगरे, मुंबई शहर आणि ठाणे शहर या सर्व मार्गांना जोडणारा हा मार्ग असणार आहे. पुढे ही मार्गिका वडाळा ते छत्रपती शिवाजी टर्मिनसला जोडणाऱ्या मेट्रो 11 ला जोडली जाणार आहे. त्यामुळे ही 58 किमी लांबीची देशातील सगळ्यात मोठी मेट्रो मार्गिका निर्माण होणार आहे. या मेट्रोच्या सर्व मार्गिका सुरु झाल्यावर 13 लाखापेक्षा जास्त दैनंदीन प्रवासी प्रवास करतील. या मेट्रोमुळे रस्त्यावरची वाहतूक मोठ्या प्रमाणात कमी होईल. पुढच्या वर्षाच्या शेवटापर्यंत या मेट्रोचे सर्व टप्पे प्रवशांकरिता खुले झाले पाहिजेत असा प्रयत्न आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली.

## लक्षवेधी

# एका दिवसात वटणार धनादेश

### 'आरबीआय'चे सर्व बँकांना परिपत्रक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** रिझर्व्ह बँकेने बँकांमध्ये खातेदारांनी टाकलेल्या धनादेशासंदर्भात नवे परिपत्रक काढले आहे. त्यानुसार खातेदाराने बँकेत जमा केलेला धनादेश त्याच दिवशी क्लिअर होणार आहे. त्यामुळे खातेदारांना त्यांच्या खात्यात पैसे ठेवूनच आता समोरील व्यक्ती, संस्थांना धनादेश द्यावा लागणार आहे. बँकेत जमा केलेला धनादेश न वटल्यास भारतीय कायद्यानुसार दंड आणि कारावास होऊ शकतो. जो निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स ॲक्ट १८८१ च्या कलम १३८ अंतर्गत येतो. ही शिक्षा धनादेशाच्या रकमेच्या दुप्पट दंड, दोन वर्षांपर्यंत कारावास किंवा दोन्ही स्वरूपाची कारवाई होऊ शकते. चेक बाऊन्स टाळण्यासाठी खात्यात पुरेशी रक्कम असणे आवश्यक आहे आणि दिलेली माहिती अचूक असणे महत्त्वाचे आहे. १५ दिवसांत पैसे न भरल्यास, धनादेश देणाऱ्यावर कायदेशीर कारवाई होऊ शकते. आता तर आरबीआयच्या नव्या परिपत्रकानुसार जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँका, राष्ट्रीयीकृत बँकांनी कार्यवाही सुरू केली आहे. आता नागरी बँकांमध्ये देखील आरबीआयच्या परिपत्रकानुसार ४ ऑक्टोबरपासून कार्यवाही सुरू होणार आहे. धनादेश ज्या तारखेचा त्या दिवशी न वटल्यास बँकेकडून किमान ५०० रुपये दंड होऊ शकतो.

# ठाण्यातील टेंभी नाका नवारात्रौत्सवास प्रारंभ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** टेंभीनाका येथील देवीची आगमन मिरवणूक कळवा येथून आज दुपारी निघाली. या मिरवणूकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे खासदार श्रीकांत शिंदे, खासदार नरेश म्हस्के यांच्यासह शिवसेनेचे अनेक पदाधिकारी कार्यकर्ते तसेच नागरिक सहभागी झाले आहेत. मिरवणूकीत मोठ्याप्रमाणात गर्दी झाली असून वाहतूकीस अडथळा निर्माण झाला आहे. त्यामुळे शहरात कळवा नाका, विटावा, कोर्टनाका आणि ठाणे स्थानक परिसरात वाहतूक कोंडी झाली आहे.

ठाण्यातील टेंभी नाका येथे धर्मवीर आनंद दिघे यांच्या मार्गदर्शनखाली १९७८ साली नवारात्रौत्सवास प्रारंभ झाला आणि ठाणे शहराच्या इतिहासातील नव्या अध्यायास प्रारंभ झाला. यंदा या उत्सवाचे ४८वे वर्ष आहे. राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील नामवंत व्यक्ती, विविध स्तरातील हितचिंतकांनी एकत्र येऊन या उत्सवाची मुहूर्तमेढ रोवली. सामाजिक एकोपा वृध्दिंगत व्हावा, या निमित्ताने भावी तरुण पिढीवर संस्कार होऊन त्यांच्या विचारांना दिशा मिळावी, त्यांचे प्रबोधन व्हावे हा उद्दात हेतू डोळ्यासमोर ठेवून धर्मवीर आनंद दिघे यांनी या नवरात्रौत्सवाचा प्रारंभ केला. उत्सवाचा हाच वारसा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुढे नेत आहेत. धर्मवीर आनंद दिघे यांनी सुरु केलेला नवारात्रौत्सव शहरातील मानाचा उत्सव मानला जातो. दिघे यांची दुर्गेश्वरी देवी ही नवसाला पावणारी देवी असल्याचे म्हटले जाते.

# बदलापुरची जलकोंडीतून मुक्ती



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** उल्हास नदीत वाढलेली गढुळता आणि सातत्याने खंडीत होणारा वीज पुरवठा यामुळे पाणी उचल आणि शुद्धीकरण क्षमतेवर परिणाम झाल्याने बदलापूर शहरात आठवड्यातून एक दिवस पाणी कपात लागू करण्यात आली होती. मात्र गेल्या काही दिवसांपासून पाण्यातील गढुळता कमी झाल्याने पाणी उचल आणि शुद्धीकरण क्षमता वाढली आहे. परिणामी लागू करण्यात आलेली पाणी कपात मागे घेण्यासाठी जीवन

### पाणी कपात मागे घेण्यासाठी जीवन प्राधिकरणाने हालचाली

प्राधिकरणाने हालचाली सुरू केल्या आहेत. त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळणार आहे. यंदाच्या वर्षात मे महिन्यापासून पावसाला सुरूवात झाली होती. त्याच सोबत बदलापूर शहराच्या वेशीवरून जवाहरलाल नेहरू न्यास ते बडोदे द्रुतगती महामार्गाचे काम सुरू असल्याने या कामात झालेल्या खोदकामातील माती उल्हास नदीच्या पात्रात आणि त्यानंतर जलवाहिन्यांमध्ये शिरली होती. त्याचवेळी शहरातील कुचकामी महावितरण व्यवस्थेमुळे सातत्याने वीज पुरवठा खंडीत होत होता. त्याचा पाणी उचल यंत्रणेला फटका बसत होता. परिणामी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पाणी उचल आणि शुद्धीकरण क्षमता कमी झाली होती. त्याचा फटका पाणी वितरण यंत्रणेला बसत होता. अनेकदा पाणी उचल १२० दशलक्ष लीटरपेक्षा कमी होत असल्याने शहरातील काही भागात कमी दाबाने पाणी पुरवठा किंवा अपुरा पुरवठा होत होता. त्यामुळे आठवड्यातून एक दिवस एका भागात पाणी कपात करून चक्राकार पद्धतीने पाणी कपात केल्यास पाण्याचे समप्रमाणात वितरण करता येणे शक्य होते. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पाणी कपात लागू केली होती.

# नामांतरणाचा मुद्दा !

## नवीमुंबई विमानतळाचे उद्घाटन लांबणीवर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई:** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नामकरणावरुन राजकारण चांगलेच पेटले आहे. या विमानतळाचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते येत्या ३० तारखेला होईल अशी घोषणा काही दिवसांपूर्वी करण्यात आली होती. परंतु, त्यानंतर या तारखेबाबत संभ्रम पसरवला जात होता. मात्र, आता हा संभ्रम दूर झाला असून ३० तारखेला या विमानतळाचे लोकार्पण होणार नाही अशी माहिती वनमंत्री गणेश नाईक यांनी दिली आहे. तसेच या विमानतळाला दि.बा पाटील यांचेच नाव दिले जाणार असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय



विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे नेते दि. बा. पाटील यांचे नाव द्यावे यासाठी आगरी-कोळी भूमीपुत्र समाजात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहे. मध्यंतरी शरद पवार यांच्या पक्षाचे खासदार सुरेश म्हात्रे (बाळ्या मामा) यांनी एक बाईक रॅली काढत या समाजातील भावनांना वाट करुन दिली. विमानतळाचा उद्घाटन सोहळा जवळ येत आहे. परंतू, अद्याप विमानतळाच्या नामकरणाविषयी स्पष्टता आलेली नाही. त्यामुळे नामकरणाविषयीची मागणी अधिक तीव्र स्वरुपात पुढे येऊ लागली आहे. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना भाजपच्या स्थानिक नेत्यांनी यासंबंधीचे आंदोलन हाती घेतले होते. त्यास भाजपच्या राज्य पातळीवरील नेत्यांची उघड साथ असल्याचेही स्पष्ट होते.

असे असताना अजूनही नामकरणाचा मुद्दा मार्गी लागत नसल्यामुळे भाजपचे स्थानिक नेते अस्वस्थ झाले आहेत. या विमानतळाच्या लोकार्पणाच्या तारखेबाबत संभ्रम पसरला होता. नक्की या विमानतळाचे लोकार्पण ३० तारखेला होईला असा सवाल सर्वांना पडला होता. परंतू, आता वनमंत्री गणेश नाईक यांनी ३० तारखेला विमानतळाचे लोकार्पण होणार नाही अशी माहिती माध्यमांशी बोलताना दिली आहे.

तसेच प्रकल्पग्रस्तांचे नेते दी. बा पाटील यांचेच नाव या विमानतळाला लागेल अशी संमती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडून मिळाली आहे. केंद्र सरकारकडून त्याला अंतिम संमती आल्यानंतर या विमानतळाचे नाव दी. बा पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ असेच राहिल, असा विश्वास देखील नाईक यांनी व्यक्त केला.

# 'शहाड' ऐवजी 'शहद' ? - सुधारणा न झाल्यास 'मनसे' पद्धतीने आंदोलन



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** शहाड रेल्वे स्थानकाच्या बोर्डावर 'शहाड' ऐवजी 'शहद' असा शब्द दिसल्याने मनसेप्रमुख राज ठाकरे संतापले. त्यांनी ही चूक गंभीर मानली आणि पदाधिकाऱ्यांना ताबडतोब लिखित निवेदन देण्याचे आदेश दिले. तसेच सुधारणा न झाल्यास मनसेच्या पद्धतीने आंदोलन होईल, असा इशारा दिला. शुक्रवारी अंबरनाथ दौऱ्यावरून परतताना राज ठाकरे यांचा ताफा शहाड स्थानकाजवळ थांबला. स्थानिक कार्यकर्त्यांनी जोरदार स्वागत केले, परंतु स्टेशनबाहेरील बोर्डावरील 'शहद' हा शब्द - पाहताच राज ठाकरे संतापले. उल्हासनगर मनसे अध्यक्ष संजय घुगे यांनी सांगितले की, ही रेल्वे प्रशासनाची निष्काळजी असून आधीही याकडे लक्ष वेधले गेले होते.

### प्रशासनाचे आश्वासन

मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी रेल्वे अधिकाऱ्यांना भेटून 'शहद' शब्द काढून योग्य 'शहाड' लिहिण्याची लिखित मागणी केली. अन्यथा आंदोलनात्मक पावले उचलली जातील, असा कडक इशारा दिला. स्थानिक नागरिकांनीही या चुकीवर रोष व्यक्त केला असून शहाडच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ओळखीला गालबोट लावणारी ही चूक लाजिरवाणी असल्याचे सांगितले. आता मनसेच्या अल्टिमेटमनंतर रेल्वे प्रशासन किती तत्परतेने दुरुस्ती करतो, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.









# कल्याणच्या किल्ले दुर्गाडी नवरात्र उत्सवाला सुरुवात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पश्चिमेतील कल्याण खाडी किनारी असलेल्या ऐतिहासिक किल्ले दुर्गाडीवर दुर्गा मातेचे मंदिर असून नवरात्री मध्ये याठिकाणी मोठा उत्सव भरतो.

देवीच्या दर्शनासाठी लाखो भक्त येतात. नवरात्री दरम्यान दुर्गाडी उत्सवात याठिकाणी जत्रा देखील भरते. या जत्रेसाठी पाळणे तसेच विविध खेळणी दाखल झाली आहेत.

आज घटस्थापने पासून या नवरात्र महोत्सवाला प्रारंभ झाला असून अश्विन शुद्ध प्रतिपदा ते विजयादशमी दरम्यान मोठ्या उत्साहात आणि आनंदाने किल्ले दुर्गाडी येथे शारदीय नवरात्रौत्सव साजरा करण्यात येतो.



## आर्थिक साक्षरता स्वच्छता सेवेसाठी प्रेरक – डॉ. विजय कोकणे

**जिल्ह्यातील बांधवाना "डिजिटल आर्थिक साक्षरता मार्गदर्शन**



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : जन सामान्यांमध्ये प्रचार व प्रसाराच्या माध्यमातून विविध सरकारी योजना, स्वच्छता जनजागृती माहिती, आरोग्य विषयक जन जागृती, कौशल्य विकास उपक्रम आदिंना प्रोत्साहन देण्याच्या उददेशाने जन शिक्षण संस्थान रायगडच्या माध्यमातून 22 सप्टेंबर 2025 रोजी "सहाण-अलिबाग" येथे "डिजिटल आर्थिक साक्षरता मार्गदर्शन" करण्यात आले तसेच आर्थिक साक्षरता स्वच्छता सेवेसाठी प्रेरक असल्याचे मत संचालक डॉ. विजय कोकणे यांनी कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केले.

संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्ष सौ. रत्नप्रभा बेल्हेकर, संचालक डॉ. विजय कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्याभरात जे. एस. एस. रायगड च्या माध्यमातून 17 सप्टेंबर ते 02 ऑक्टोबर या 15 दिवसांच्या कालावधीत विविध स्वच्छतेवर आधारित जनजागृती कार्यक्रम व उपक्रम स्वच्छता ही सेवा उपक्रमाअंतर्गत राबविण्यात येणार आहेत अशी माहिती संचालक डॉ. विजय कोकणे यांनी दिली आहे. "कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार" यांच्या विशेष पुढाकारातून संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये व्यवसाय प्रशिक्षणाचे कार्य मागील 20 वर्ष पासून सक्रिय पणे सुरु आहे व आता पर्यंत 70 हजार पेक्षा जास्त लाभार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण देण्यात आले आहे. याच स्वच्छता, आरोग्य व जनजागृती उपक्रमाचा एक भाग म्हणून "सहाण-अलिबाग" येथे "डिजिटल आर्थिक साक्षरता मार्गदर्शन" या उपक्रमाप्रसंगी संचालक डॉ. विजय कोकणे, धर्मराज सामाजिक प्रतिष्ठान रायगडचे संचालक श्री. सचिन चव्हाण, अकाउंट मॅनेजर सौ. प्रतिक्षा चव्हाण, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी सौ. कल्पना म्हात्रे, समन्वयक सौ. ममता पाटील, स्टाफ मेंबर सौ. रिद्धी पाटील, श्री. अजय पाटील, श्री. हिमांशू भालकर तसेच प्रशिक्षक व प्रशिक्षणार्थी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्साहात पार पडला.

## जीवनदीप महाविद्यालयाच्या ध्रुवची ब्राँझ पदक कमाई




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वेटलिफ्टिंग, पावर लिफ्टिंग या क्रीडा प्रकारांबरोबरच आता जीवनदीपच्या एका विद्यार्थ्याने रायफल शूटिंग स्पर्धेत गोवा येथे झालेल्या बाराव्या बेस्ट झोन 50 मीटर रायफल शूटिंग स्पर्धेत ब्राँझ पदकाची कमाई केली आहे.

जीवनदीपचा ध्रुव किनलेकर हा शिक्षण घेत असतानाच या क्रीडा प्रकाराचा देखील सराव करायचा त्याच्या या अथक परिश्रमाला हे पदक प्राप्त झाल्याने ध्रुव वर त्याच्या परिवारातून व मित्र परिवारातून तसेच जीवनदीप संस्थेचे अध्यक्ष रविंद्र घोडविंदे, प्राचार्य. डॉ.अशोक वाघ, उपप्राचार्य. हरेंद्र सोष्टे,संचालक प्रशांत घोडविंदे, क्रीडा शिक्षक. मोहनीश देशमुख या सर्वांकडून ध्रुववर कौतुकाचा वर्षाव होत आहे.



# नवरात्रि 2025

### दुसरा दिवस : दुसरी माळ

## आजची देवी : श्री ब्रह्मचारिणी



नवरात्र हा भारतातील सर्वात महत्वाचा आणि शुभ सण आहे. जगभरातील हा सण साजरा केला जातो. जो दुर्गा देवीच्या नऊ रूपांना समर्पित आहे. नवरात्री हा शब्द संस्कृत भाषेतून आला आहे. नव' म्हणजे 'नऊ' आणि 'रात्री' म्हणजे 'रात्र'. तर नवरात्री देवीची 9 रूपे कोणती आहेत जाणून घ्या. शरद ऋतूत महत्त्वाचे सण म्हणजे नवरात्रोत्सव, दसरा, कोजागिरी पौर्णिमा, धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा, पाडवा, भाऊबीज... असे येतात. सुरुवात होते आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून, म्हणजे घटस्थापनेपासून. आदिमाया, आदिशक्तीच्या उपासनेचे नऊ दिवस म्हणजे नवरात्रींचा उत्सव. या उत्सवाची रंगत सर्व उत्सवांपेक्षा वेगळी आहे. घरात, मंदिरात, मंडपात दुर्गामातेची प्रतिष्ठापना करतात. या उत्सवाचा संबंध थेट बळिराजाच्या कष्टाशी आहे, कष्टकरी शेतकऱ्यांच्या साध्याभोळ्या संस्कृतीशी आहे. घटस्थापना म्हणजे बीजपरीक्षण! वावरात जी पिकं घेतली जातात, त्यापासून अन्नधान्य मळतं. त्या काळ्या आईच्या उपकारांची जाणीव ठेवणं, कृषिवलांचे ऋण मान्य करणं, कृतज्ञता मानणं, धन्यवाद देणं म्हणून हे नऊ दिवस! नवरात्रीच्या नऊ दिवसांमध्ये आदिशक्ती दुर्गेच्या नऊ रुपांची पूजा केली जाते. ही नऊ रूपे नवदुर्गा म्हणून ओळखली जातात.

### श्री ब्रह्मचारिणी

देवी ब्रह्मचारिणीचे रूप अतिशय शांत आणि सुंदर आहे. ती पांढरे कपडे घालते. तिच्या उजव्या हातात जपमाळ आणि डाव्या हातात पाण्याचा भांडे आहे. श्वेत वस्त्र हे शांती आणि पवित्रतेचे प्रतिक आहे. तर उजव्या हातातील जपमाळ ज्ञान आणि तपश्चर्येचे प्रतिक आहे. तर डाव्या हातातील कमंडलू ज्ञान आणि शिक्षणाचे प्रतिक आहे. देवी अत्यंत शांत स्वभावाची असून खूप दयाळू आहे. तर देवी ब्रह्मचारिणी तपश्चर्या आणि त्यागाची देवी मानली जाते.देवी ब्रह्मचारणी ही या संपूर्ण सृष्टीतील सर्व प्रकारच्या विद्येची तसेच ज्ञानाची जाणकार आहे. देवी ब्रह्मचारिणीची आराधना केल्याने ज्ञानाची प्राप्ती होते. देवी ब्रह्मचारिणीला सर्व शास्त्रांचे ज्ञान आहे. देवी आपल्या भक्तांना आपले सर्व ज्ञान देऊन विजयी करते.देवी ब्रह्मचारिणीला खडी साखर किंवा साखरेचा भोग अर्पण करतात. नवरात्रीच्या पहिल्या दिवशी जशी शास्त्रीय पद्धतीने शैलपूत्री देवीची पूजा करतात त्याचप्रमाणे देवी ब्रह्मचारिणीची पूजा केली जाते. ब्रह्म मुहूर्तावर उठून स्नान केल्यानंतर, पूजास्थळावर गंगाजल शिंपडा आणि संपूर्ण कुटुंबासह देवी दुर्गाची पूजा करा. ब्रह्मचारिणी मातेच्या पूजेमध्ये पिवळ्या रंगाचे कपडे घाला आणि फक्त पिवळ्या रंगाच्या वस्तू अर्पण करा. पंचामृताने आईला स्नान घालल्यानंतर, हळद आणि कुंकू अर्पण करा. यानंतर, हवन करा त्यामध्ये लवंग, बताशा इत्यादी हवन समाग्री अर्पण करा. ब्रह्मचारिणी मातेच्या पूजेमध्ये पिवळ्या रंगाची फळे, फुले इत्यादींचा वापर करा.

## पडघ्यात ढोल ताशांच्या गजरात दुर्गा देवीचे आगमन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता/**पडघा** : वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथे ढोल ताशांच्या गजरात श्री दुर्गादेवीची आगमन मिरवणुक उत्साहात पार पडली.

सोमवार पासुन नवरात्रोत्सवाची सुरवात झाली असुन घरगुती कुलदैवत व सार्वजनिक नवरात्रोत्सवानिमीत्त दुर्गादेवीच्या मुर्तीची प्रतिष्ठापना करुन नऊ दीवस गरबा रास बरोबर विवीध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते त्यासाठी पडघा व परिसरातील विविध सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळानी दुर्गादेवीचे भव्य स्वागत करुन मुर्तीची मंडपात प्रतिष्ठापना केली तत्पूर्वी अनेक सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळांच्या वतीने फटाक्यांच्या आतेषबाजीत ढोल, ताशांच्या गजरात देवीमुर्ती कारखाना ते मंडपापर्यत दुर्गादेवीची आगमन मिरवणुक काढण्यात आली होती यावेळी विविध मंडळाचे पदाधिकारी कार्यकर्ते या मिरवणुकीत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# आई तुझ्या गं चरणी...

## लाखो भाविकांचे श्रद्धास्थान खरोशीची केळंबा माता

पेण तालुक्यातील मुंबई-गोवा महामार्गावरील जिते नाक्यावरून पूर्वेस साधारणतः दोन किलो मीटर अंतरावर पक्क्या डांबरी रस्त्याने जोडलं गेलेलं खरोशी गाव तसं बाळगंगा नदीच्या काठी बसलेले. मुळातच निसर्गरम्य सानिध्य लाभलेल्या डोंगरद-यांच्या कुशीत बसलेल्या खरोशी गावाच्या उत्तरेस डोंगर माथ्यावर आहे. सर्वांच्या श्रद्धेचे श्री केळंबा देवीच मंदिर.


पेण परिसरातील व मुंबईपासून ७० कि.मी. अंतरावर असलेल्या सर्वपरिचीत अशा भक्तांचे श्रद्धास्थान असणारी स्वयंभू साश्वत आणि सदैव जागृत असणा-या व नवसाला पावणा-या वेळोवेळी संकटाच निवारण करणाऱ्या खरोशी येथील श्री केळंबादेवीची माहिती आपल्या हाती देताना मता अतिशय आनंद होत फार फार वर्षापूर्वी इथल्या डोंगर माथ्यावर ऋषींचे वास्तव्य होते. बाळगंगा नदीच्या काठावरून या पवित्र ठिकाणी जाताना रस्त्याच्या बाजूला दुतर्फा पारिजातक, फणस, आंबा, चाफा यांची असंख्य झाडे आहेत. त्यामधून जाणानश-या वाटेवर नजर पडली की वाटतचं श्री केळबादेवी आपणास दर्शनासाठी बोलवित आहे. देवीच्या रस्त्याला लागलो की, निसर्गाचा अविष्कार असलेला हिरवागार, सुखद असा रम्य परिसर पाहिला की, मनाला जी एक शांती लाभते त्याची तुलनाच करता येणार नाही मंदिराच्या परिसरात कुठेही पहायला मिळणार नाही इतक मोठ बेल वृक्षांच रानच्या रान आहे. तसेच केळी, चाफा रामवृक्ष, कणेरी या सारख्या इतरही फुलझाडांनी परिसर फुलून गेलेला आपणास दिसून येईल, अशा ठिकाणी .... वास्तव करुन आहे

तुमची आमची सगळ्यांची आई.
हाकेला धावणारी, नवसाला पावणारी,
श्रद्धास्थान असणारी आई श्री केळंबादेवी.

फार वर्षापूर्वीची गोष्ट आहे की, एके दिवशी गावातील एक गृहस्थ केळीची पाने आणण्यासाठी डोंगर माथ्यावर गेला असता त्याने एक पूर्ण केळच तोडली त्या केळीमधून लाल रक्त वाहू लागले. हा प्रकार पाहताच तो गृहस्थ घाबरला व सरळ गावात येऊन सदरचा प्रकार त्यांनी गावक-याच्या कानावर घातला हे ऐकताच सर्व गावकरी त्या घडलेल्या चमत्कारिक दृश्याची पाहणी करण्याकरिता गेले असता त्यांनाही त्या केळीमधून लाल रक्त येत असल्याचे दिसून आले. या पाहिलेल्या दृश्यांची माहिती निष्णांत ज्योतिषाला सांगितली व त्याने सांगितले की, इथे निक्षितपणे भगवंताचे स्थान आहे. परमेश्वराचे स्थान आहे. या जागेवर देवीचे वास्तव्य आहे. त्यामुळे त्या ठिकाणी स्थापना करण्यात आली, केळीच्या झाडातून प्रकट झालेल्या साक्षात व स्वयंभू देवीला श्री केळंबादेवी हे नाव देण्यात आले.

आजतागायत श्री केळंबादेवी जागृत असल्याची अनेक भक्तगणाना प्रचिती आली आहे. कोणत्याही कार्याची सुरुवात करा वा संकटकाळी फक्त देवीच नामस्मरण करा म्हणजे आपल्या संकटाच निवारण करण्यासाठी धावून येणारच या बाबतीत हजारो लोकांचे अनुभव आपणास ऐकावयास मिळतील म्हणून तर नवरात्र उत्सवा व्यतिरिक्त दर मंगळवारी बाहेरील गावातील तसेच पेण, पनवेल, उरण, अलिबाग, ठाणे, मुंबई येथील लोक मोठ्या प्रमाणावर श्री केळंबा देवीच्या दर्शनाला येत असतात.






श्री केळंबा देवीचा नवरात्र उत्सव दरवर्षी फार मोठ्या आनंदाने साजरा केला जातो. घटस्थापनेच्या दिवशी गावातून देवीची पालखी वाजत गाजत माऊलीच्या देवळात नेली जाते. नवरात्रीचे नऊ दिवस गावातील तसेच गावाच्या बाहेरील भक्तगण श्री केळंबा देवीच्या भक्तीपोटी, प्रेमापोटी व नवसापोटी देवळात दिवसरात्र वास्तव्य करून राहतात. नवरात्रीच्या उत्सवात नवस फेडण्यासाठी दूरशेत, जिते, बळवली, खारपाडा,गोविर्ले, आंबिवली दादर, रावे,जोहे, कळवे हमरापुर या पंचक्रोशीतील लोकांची खूपच रिघ लागलेली असते. देवीच्या वास्त वाचा, संकटकालीन दर्शनाचा अनुभव कित्येक लोकांना आल्यामुळे प्रत्येक वर्षो वा भक्तगणात खूपच वाढ झालेली दिसून येते. घटस्थापने पासून नवव्या दिवशी श्री केळंबादेवीची पालखी देवळातून निघून टाळ मृदुगांच्या तालात भजन म्हणत गुलाल-बुक्का उधळत वाजत गाजत मिरवणुकीने पुन्हा गावात आणली जाते. अशा या जागृत, स्वयंभू नवसाला पावणाऱ्या श्री केळंबा देवीचे मंदिर श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळापासून म्हणाने शके १६०७ मध्ये बांधले होते. आजपर्यंत ४१८ वर्षे या मंदिरास झाली. सर्व गावक-यांनी एक निश्चयाने एक दिलाने एक मनाने मंदिराचा जिर्णोद्धार करून गावकरी मंडळीनी आपल्या समस्या अडचणी, संकटे बाजूला सारून व भक्तगणांकडे मदतीचा हात मागून आज हे भव्य आणि दिव्य मंदिर उभे केले आहे.

माऊली केळंबा मातेचा नवरात्र उत्सव २२ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर असा दहा दिवश चालणार आहे या नवरात्री नऊ दिवस नवनाथ भाऊबंद व म्हात्रे यांची पाळी असल्यामुळे ते दहा दिवस माऊलींची सेवा करणार असून गावातील घरत पाटील ठाकूर म्हात्रे माळी भोंडकर व गावंड भाऊबंद आलेल्या सर्व भक्तांना मनोभावे दर्शन देऊन त्यांचे स्वागत करण्यात येते.

**धनाजी घरत**
**खरोशी पेण**

तसेच लाखो भक्तगण मोठ्या श्रद्धेने नवरा बोलण्यासाठी नवस फेडण्यासाठी येत असतात. नवरात्रीचा उत्सवात लाखो भाविक दर्शन घेतात. आलेला प्रत्येक भक्तगण डीजेच्या तालावर मनसोक्तपणे नृत्य करून आनंद द्विगुणित करत असतात. आणि नंतर त्यांची पावले घराकडे वळतात अशा माऊलीच्या दर्शनासाठी आलेल्या सर्व भाविकांचे मनापासून स्वागत.

## कुरुंद येथील युरिया खत साठ्यावर कृषी विभागाची धडक कारवाई

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा** : भिवंडी तालुक्यातील कुंरूद येथील एका गोदामात काळ्या बाजारात विक्रीसाठी साठा करुन ठेवलेल्या युरिया खतांवर कृषी विभागाच्या गुण नियंत्रण शाखेनी धडक कारवाई करत १ कोटी २८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

सविस्तर घटना अशी की पडघा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दादासो एडके यांना मुबई नाशीक महामार्गावर मालवाहू ट्रक मधुन यूरीया सदृश खत काळ्या बाजारात विक्रीसाठी नेत असल्याचा संशय आल्याने त्यांची खबर त्यांनी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना दिली त्यानुसार कृषी विभागाचे गुण नियंत्रक निरीक्षक विवेक दोंदे यांनी घटनास्थळी येऊन यूरीया खताची खात्री करून संबधीत ट्रक चालकाची चौकशी करून त्याच्याकडे टेक्निकल ग्रेड यूरीयाची बिले मागीतली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यावरून कृषी विभाग व पोलिसांनी ज्या गोदामामधुन युरिया खत ट्रकमध्ये भरण्यात आला होता. त्या कुरुंद येथील के स्क्वेअर लॉजेस्टीक पार्कमधील डी-८ गोदामावर ठाणे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाच्या गुण नियंत्रण शाखेचे विभागीय कृषी सहसंचालक शिवाजी आमले, अधीक्षक कृषी अधिकारी बालाजी ताटे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रामेश्वर पाचे, जिल्हा गुण नियंत्रण निरीक्षक बालाजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकास्तरीय गुण नियंत्रण निरीक्षक विवेक दोंदे यांनी पडघा पोलिसांच्या मदतीने छापा घातला असता नऊ कामगार अनुदानित शेतीउपयोगी युरियाच्या गोणी मधील युरिया खत औद्योगिक वापरासाठीच्या टेक्निकल ग्रेड युरिया खताच्या गोण्यामध्ये भरून पुन्हा पॅकिंग करण्याचे काम करत असल्याचे आढळून आले. व सदर गोदामात कोणत्याही प्रकारचा परवाना आढळून न आल्याने संपूर्ण गोदामाची तपासणी केली असता सफेद रंगाचे औद्योगिक वापरासाठीचे प्लास्टिक गोणीतील युरिया खताच्या १२१७ गोणी ,पिवळ्या रंगाच्या शेती उपयोगी वापराच्या युरिया खताच्या ५१ गोणी, औद्योगिक वापरासाठीचे प्लास्टिक गोणीतील युरिया खताच्या १४०० गोणी २ ट्रक, युरिया खताच्या पिवळ्या व सफेद रंगाच्या रिकाम्या गोण्या, शिलाई मशीन,नायलॉन दोरी बंडल व इतर साहीत्य अनधिकृतपणे आढळून आले.त्यावरून पंचनामा करून गोदाम सिल बंद करण्यात आले तर कृषी अनुदानित युरिया खता ची तस्करी करून औद्योगिक वापरासाठी वापरल्या जाणाऱ्या टेक्निकल ग्रेड युरियाच्या नावाने काळाबाजार करून जादा नफा कमविण्याच्या उद्देशाने संगनमत करून शासनाची फसवणूक केल्याच्या कारणावरून १६ आरोपी विरोधात विवीध कलमांतर्गत पडघा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून दोन मालवाहू ट्रक सहीत १कोटी २८ लाख ३१ हजार ७३६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.


जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅग्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in





## आजचे राशि भविष्य



**मेष**
तुमची धन संबंधित काही गोष्ट कोर्ट-कचेरीत आटलेली असेल तर आज त्यात तुम्हाला विजय मिळू शकतो आणि धन लाभ ही होऊ शकतो.

**वृषभ**
पैसा दुसऱ्यांना देणे कुणाला आवडत नाही परंतु, कुणी गरजूला पैसा देऊन आनंदाचा अनुभव कराल. जंगी पार्टीत सर्वांना सामावून घ्या.

**मिथुन**
तुमचा तणाव वाढेल आणि तुम्ही उदासही व्हाल. तुमच्या भाऊ-बहिणींपैकी आज कुणी तुमच्याकडून उधार मागू शकतात.

**कर्क**
निष्पाप वागणूक यामुळे कुटुंबातील समस्या सोडविण्यात तुम्ही महत्त्वाची भूमिका बजावू शकाल.शब्द अतिशय काळजीपूर्वक वापरा.

**सिंह**
मुलांच्या यशस्वी होण्यामुळे अभिमान वाटेल. लोक तुमच्या बाबतीत काय विचार करतात या गोष्टीचा काहीही फरक पडणार नाही.

**कन्या**
जे लोक तुमच्या प्रेमी पासून दूर राहतात त्यांना प्रेमीची आठवण त्रास देऊ शकते. रात्रीच्या वेळी प्रेमी सोबत तासन तास फोनवर बोलू शकतात.

**तूळ**
तुमची आर्थिक स्थिती खराब होऊ शकते. तुमच्याकडे काही वेळ मागण्याची तसेच भेटवस्तूही मागण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक**
वरिष्ठ अगदी देवदूतासारखी वागणूक देत आहेत, असे वाटते. तुमचे धन कुठे खर्च होत आहे यावर तुम्हाला नजर ठेवण्याची आवश्यकता आहे.

**धनु**
तुम्ही रिकाम्या वेळेत कुणासोबत भेट घेणे ही पसंत करणार नाही आणि एकांतात आनंदी राहाल. किमती वेळ खराब करू नका.

**मकर**
जोडीदाराच्या पुन्हा प्रेमात पडाल, कारण तो/ती यासाठी खरच लायक आहे. वेळ कसा व्यतीत होतो या गोष्टीचा अनुभव तुम्हाला होऊ शकतो.

**कुंभ**
अमर्याद सर्जनशीलता आणि उत्साह तुम्हाला अधिक फायदेशीर दिवसांकडे घेऊन जाईल. तुमच्यातील लहान मूल जागे होईल.

**मीन**
येणाऱ्या काळात तुम्हाला समस्यांचा सामना करावा लागू शकतो. वादविवाद, दुस-यावर तोंडसुख घेणे आणि इतरांमधील दोष शोधत राहणे टाळा.


नियमित वाचा
दै. ठाणे जीवनदीप वार्ता

# भटक्या विमुक्त जमातींना आता फिरती शिधापत्रिका !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** राज्यभरात फिरून आपली उपजिविका भागविणाऱ्या विमुक्त जाती व भटक्या जमातींना आता केवळ स्वयंघोषणापत्राच्या आधारे फिरती शिधापत्रिका तसेच आधारकार्ड, मतदान ओळखपत्र देण्याचा महत्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. विमुक्त जाती व भटक्या जमातीमधील सुमारे अडीच-तीन कोटी लोकांना या योजनांचा फायदा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

भटक्या जमाती पारंपरिक पद्धतीने एकाच ठिकाणी न राहता फिरत्या स्वरूपात आपला उदरनिर्वाह करत असतात. राज्यात विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाची संख्या लक्षणीय असून, यामध्ये ८५ लाख धनगर, ६५ लाख वंजारी, गोंधळी, मरागाईवाले आणि गोसावी (एनटी-बी) यांची संख्या ६० लाखाच्या आसपास तर बंजारा, बेरड, रामोशी या विमुक्त जातींमधील लोकांची संख्या ६० लाखाच्या घरात आहे.




या जाती-जमातींच्या भटक्या जीवनशैलीमुळे सरकारच्या विविध योजनांचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहचविणे यंत्रणांसाठी आव्हानात्मक असते. विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या नागरिकांना त्यांचे मूलभूत अधिकार व सरकारच्या विविध योजनांचे लाभ मिळण्यासाठी आवश्यक असलेली ओळखपत्रे, शासकीय प्रमाणपत्रे व विविध योजनांचा लाभ देण्यासाठीच्या कार्यपद्धतीत सुधारणा करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून त्याबाबतचा शासन निर्णयही निर्गमित करण्यात आल्याची माहिती उच्चपदस्थ अधिकाऱ्याने दिली.

त्यानुसार आता केवळ स्वयंघोषणापत्राच्या आधारे विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या नागरिकांना विविध ओळखपत्रे, प्रमाणपत्रे व विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यात येणार आहे.

यानुसार विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या नागरिकांना आधारकार्ड मिळविण्यात येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन आता ते वर्षातील काही दिवस ज्या विकाणी जाऊन रहिवास करतात, अशा विकाणी त्यांना आधारकार्ड देण्यात येणार आहे.

# बुद्धिबळ स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवावा !

## महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांचे आवाहन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** बुद्धिबळ स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेचा व एकाग्रतेचा विकास होण्यास मदत होते त्यामुळे जास्तीत जास्त शाळांनी,विद्यार्थ्यांनी बुद्धिबळ स्पर्धांमध्ये आपला सहभाग नोंदवावा असे प्रतिपादन महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी आज केले. क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे आणि कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन आज, जे ए ई



एस इंग्लिश हायस्कुल, जोशी बाग, कल्याण (प) येथे करण्यात आले होते, या बुद्धिबळ स्पर्धेचे उद्घाटन महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांचे हस्ते आज करण्यात आले त्यावेळी बोलताना त्यांनी हे प्रतिपादन केले.

या बुद्धिबळ स्पर्धेचा उद्घाटन सामना महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांचे विरुद्ध माजी आमदार नरेंद्र पवार यांच्यामध्ये रंगला . सदर सामन्यानंतर आयुक्त अभिनव गोयल यांनी स्वतः उपस्थित खेळाडूंना,बुद्धिबळपटूंना भेट देऊन खेळासाठी शुभेच्छा दिल्या.शिक्षण विभागाचे उपायुक्त संजय जाधव यांनी खेळाडूंचा आढावा घेत त्यांना शुभेच्छा दिल्या . सदर बुद्धिबळ स्पर्धेमध्ये U/ 14,17, व 19 या वयोगटातील एकूण 1545 खेळाडूंनी सहभाग नोंदवला असून सदर स्पर्धा दोन दिवस सुरू राहणार आहे. सदर स्पर्धा संघटनेच्या अधिकृत पंचांच्या माध्यमातून घेण्यात आल्या.

या समयी क्रीडा व सांस्कृतिक विभागाचे उपायुक्त संजय जाधव, क्रीडा पर्यवेक्षक प्रविण कांबळे, त्यांचे सहकारी संतोष पाटील तसेच संस्थेचे पदाधिकारी, संबंधित शाळेच्या मुख्याध्यापिका खेळप्रमुख योगेश सावंत, क्रीडा समिती सदस्य कृष्णा बनगर, डॉ विजय सिंग, डॉ बागराव , गजानन वाघ , सहभागी शाळांचे क्रीडा शिक्षक तसेच शिक्षण व क्रीडा विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# मुलुंड टोलनाक्याजवळ ८ वाहनं एकमेकांवर धडकली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबईतील मुलुंड टोलनाक्याजवळ सोमवारी सकाळी सात ते आठ वाहने एकमेकांवर धडकल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात सर्व वाहनांचे नुकसान झाले आहे. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. या अपघातामुळे मुलुंड टोलनाक्यावर मोठी वाहतूक कोंडी झाली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईहून ठाण्याकडे जाणाऱ्या मार्गावर हा अपघात घडला. पुढील कारने अचानक ब्रेक दाबल्याने मागून भरधाव येणाऱ्या गाड्या एकमेकांवर धडकल्या.

यामुळे मुंबई-ठाणे मार्गावर काही काळ मोठी वाहतूक कोंडी झाली होती. वाहतूक पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत सर्व वाहनं बाजूला करत वाहतूक पूर्ववत केली. याप्रकरणी नवघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

# दहिसर टोल नाक्याच्या स्थलांतरणावर शासन ठाम !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :** भाजप आणि स्थानिक भूमिपुत्रांचा विरोध सुरू असतानाही दहिसर पथकर नाका स्थलांतरित करण्याच्या निर्णयावर शासन ठाम असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले आहे. यासाठी लागणाऱ्या जागेचा शोध घेण्याची जबाबदारी शासकीय विभागांकडे सोपवण्यात आली आहे.

मुंबईच्या दक्षिण तोंडाशी असलेला दहिसर पथकर नाका पुढे मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील वर्सोवाजवळ स्थलांतरित करण्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. या निर्णयामुळे मुंबईकरांत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र याला मिरा-भाईंदर आणि वसई-विरारमधील भूमिपुत्रांनी विरोध दर्शविला आहे.

भाजपने पथकर नाक्याच्या स्थलांतराला समर्थन दिले असले तरी जागेच्या प्रश्नावरून शिवसेनेला गोत्यात आणण्याचा प्रयत्न केला आहे. मागील आठवड्यात वनमंत्री गणेश नाईक यांनी वर्सोवा येथील वनविभागाची जागा कोणत्याही परिस्थितीत पथकर नाक्यासाठी देणार नसल्याचे आश्वासन भूमिपुत्र संघटनेला दिले होते. त्यामुळे या विषयावर भाजप-शिवसेना वाद उभा राहिला आहे. दरम्यान, दहिसर पथकर नाका स्थलांतरित करण्याच्या निर्णयावर शासन ठाम असल्याचा दावा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी पुन्हा केला आहे. शासनाच्या या निर्णयाचे जनतेत स्वागत झाले असून पथकर नाक्याची समस्या दूर व्हावी, अशी प्रत्येक प्रवाशाची मागणी आहे. तरीदेखील काही जण राजकीय हेतूने या निर्णयाला विरोध करण्याचा प्रयत्न करत आहेत.

सरनाईक म्हणाले की, सर्व समस्यांचे निवारण करून पथकर नाका लवकरच स्थलांतरित केला जाणार आहे. याबाबत लोकप्रतिनिधी म्हणून शिंदे यांनी निर्णय घेतला आहे, तर यासाठी लागणारी जागा निश्चित करून अंमलबजावणी करण्याचे काम शासकीय यंत्रणेकडे आहे. यासाठी एमएसआरडीसी विभाग सर्वेक्षण करत असून राष्ट्रीय महामार्ग विभागाशीही पत्रव्यवहार सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



# ५० हजार कोटींचा तोटा

## शासकीय महामंडळे सरकारसाठी पांढरा हत्ती ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** तोट्यातील महामंडळे बंद करण्याच्या सल्ल्याकडे राज्य शासनाने वर्षानुवर्षे दुर्लक्ष केल्यानेच राज्यातील एकूण ११० पैकी तब्बल ४३ टक्के महामंडळे ही तोट्यात होती तर नऊ टक्के महामंडळे 'ना नफा ना तोट्या'त सुरू होती. विशेष म्हणजे तोट्यातील मंडळांना ५० हजार कोटींपेक्षा अधिक तोटा झाल्याने ही मंडळे सरकारसाठी पांढरा हत्ती ठरली आहेत.

देशातील सर्व राज्यांच्या वित्त सचिवांची दोन दिवसांची परिषद नुकतीच पार पडली. त्यात महाराष्ट्राच्या वित्त सचिव (वित्त व कोषागरे) डॉ. रिचा बागला यांनी राज्यातील वित्तीय सुधारणांबाबत सादरीकरण केले. २०२२-२३ या आर्थिक वर्षापर्यंत राज्यात विविध ११० सार्वजनिक उपक्रम किंवा मंडळे कार्यान्वित होती. त्यानंतर गेल्या दोन वर्षांत ही संख्या १३२ झाली आहे.

२०२२-२३ या वर्षातील अस्तित्वात असलेल्या ११० पैकी ५२ महामंडळांची एकूण वार्षिक उलाढाल ही १ लाख २२ हजार कोटी एवढी होती. त्याच काळातील ४० महामंडळांची वार्षिक उलाढाल काहीच नव्हती, अशी आकडेवारी सादर करण्यात आली आहे. वार्षिक उलाढालीपैकी उर्जा क्षेत्रातील चार कंपन्यांची वार्षिक उलाढाल ही १ लाख १२ हजार कोटी होती. कार्यान्वित असलेल्या मंडळांपैकी ४३ टक्के तोट्यात तर ४१ टक्के फायद्यात होती. नऊ टक्के मंडळांना ना नफा ना तोटा झाला होता. सात टक्के मंडळांची वित्तीय आकडेवारीच उपलब्ध झाली नव्हती. ११० पैकी ९१ मंडळे कार्यान्वित होती तर १९ मंडळे बंद पडली होती.

शासकीय महामंडळे पांढरा हत्ती ठरली असली तरी नवीन मंडळांची भरच पडत आहे. गेल्या वर्षी विधानसभा निवडणुकीपूर्वी विविध जातनिहाय समाजांची मंडळे स्थापन करण्याची घोषणा झाली होती. तेव्हा काही ठराविक जातींचा अपवाद वगळता अन्य जातींची मंडळे महायुती सरकारने स्थापन केली होती.

तोट्यातील मंडळे बंद करावीत, असा सल्ला भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांनी (कॅग) देऊन अनेक वर्षे लोटली. तोट्यातील मंडळे बंद करण्याची विधानसभेत घोषणाही अनेकदा झाली. पण सरकारच्या पातळीवर मंडळे बंद करण्याची इच्छाशक्ती दाखविली जात नाही.

गेल्याच वर्षी 'कॅग'ने सादर केलेल्या अहवालात राज्यातील ४१ मंडळांना ५० हजार कोटींपेक्षा अधिक तोटा झाल्याची आकडेवारी सादर केली होती. तोट्यातील मंडळांमध्ये महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ, एस.टी. मंडळ, महाराष्ट्र वस्त्रोद्योग मंडळ, महानिर्मिती कंपनी, मुंबई - पुणे एक्स्प्रेस वे लिमिटेड अशा विविध मंडळे वा कंपन्यांचा समावेश आहे. एमआयडीसी, मुंबई महानगर क्षेत्रविकास प्राधिकरण ही महामंडळे फायद्यात आहेत.

# बदलापूरची बजबजपुरी

## बदलापूर नगरपालिकेचे न्यायालयाकडून वाभाडे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** तब्बल पाचशे कोटी रुपयांचा चुराडा केल्यानंतरही बदलापूर नगरपालिका भुयारी गटारे बनवण्यात सपशेल अ-पयशी ठरली आहे. त्यामुळे शहरात सर्वत्र अक्षरशः गटारगंगा वाहत असून हे सांडपाणी थेट उल्हास नदीत सोडले जात आहे. बिल्डर आणि प्रशासनाच्या भ्रष्ट युतीमुळे बदलापूरचे 'बजबजपूर' झाले असून मुंबई उच्च न्यायालयाने जोरदार तडाखे लगावल्यानंतर बिल्डर लॉबी आणि नगर परिषद प्रशासनाची तंतरली आहे.

दक्षिण मुंबई, दादर परिसरातून मराठी माणसांची वस्ती परवडणाऱ्या घरांमुळे अंबरनाथ, बदलापूरकडे सरकली. त्यातच मुंबई-ठाण्याच्या तुलनेत स्वस्त मिळणाऱ्या घरांमुळे परप्रांतातून आलेल्यांनीही मोठ्या प्रमाणावर घर खरेदी केली आहे. त्यामुळे अल्पावधीतच बदलापूरची लोकसंख्या पाच लाखांच्या घरात पोहोचली आहे. घरांची वाढती मागणी असल्याने बदलापूरमध्ये बांधकामांचे पेव फुटले. मात्र नगर परिषदेने गेल्या १५ वर्षांत ५०० कोटी रुपयांचा चुराडा केल्यानंतरही मलनिस्सारणाची योग्य व्यवस्थाच उभी केलेली नाही आणि बांधकामे करणाऱ्या बिल्डरांकडूनही सांडपाणी वाहून नेण्याची व्यवस्था उभी करण्याआधीच त्यांना बांधकामाच्या परवानग्या आणि पूर्णत्वाचा दाखलाही दिला. परिणामी अख्ख्या शहरात गटारगंगा वाहू लागली. त्यामुळे आरोग्याचा प्रश्न उभा राहिलाच, पण त्याचबरोबर हे सांडपाणी उल्हास नदीत सोडण्यात आल्याने नदीही प्रदुषित झाली. बदल पूरचे नागरिक यशवंत भोईर यांनी हायकोर्टात याचिका दाखल केल्यानंतर न्यायालयाने याबाबतचा निकाल देताना बदलापूर नगरपालिकेचे आणि बिल्डर लॉबीचे अक्षरशः वाभाडे काढत त्यांना दंड ठोठावला आणि तज्ज्ञ समिती नेमून ब्लू प्रिंट देण्याचे आदेश दिले.

याबाबतच्या बातम्या वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्ध झाल्यानंतर बदलापूर नगर परिषदेत अधिकाऱ्यांची पळापळ झाली. अधिकारी प्रचंड अक्शन मोडवर आले असून नगररचना विभाग आणि बांधकाम विभागाचे अधिकारी नगर नियोजनाच्या फायली उपसू लागले आहेत. नगर परिषदेचे मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांनी सर्वच खातेप्रमुखांची तातडीने बैठक बोलावल्याची माहिती बांधकाम विभागातील एका अधिकाऱ्याने दिली. त्यात नगररचना विभाग आणि बांधकाम विभागाचे अधिकारी रडारवर असून या बैठकीत पुढचा अक्शन प्लॅन तयार करण्यात येणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

# पनवेल महापालिकेची वर्धिनी केंद्रे लवकरच सेवेत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल :** पालिकेच्या आरोग्य विभागाने गेल्या पाच वर्षात उपचार दिलेल्या रुग्णांची संख्या १६ लाखांवर पोहचण्याच्या वाटेवर असताना महापालिकेने ज्या ठिकाणी महापालिकेच्या स्वमालकीच्या जागा नाहीत अशा ठिकाणी सुद्धा आरोग्य वर्धिनी केंद्र उभारण्याचा निर्णय घेतला आहे. पुढील काही दिवसांमध्ये पनवेल महापालिका क्षेत्रात कोपरा, तळोजा, नवीन पनवेल, देवीचा पाडा, तक्का या पाच नवीन ठिकाणी आरोग्यवर्धिनी केंद्र सुरू झाल्यावर नागरिकांना वैद्यकीय उपचार मिळू शकतील. राज्य सरकारच्या आरोग्य विभागाने पोर्टेबल कंटेनर केबीनमध्ये आरोग्यवर्धिनी सुरू करण्याच्या सूचना महापालिकेला केल्या होत्या, त्यानूसार महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी पालिकेच्या आरोग्य विभागाला यासंदर्भात तातडीने अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले. त्यानूसार महापालिकेने पाच ठिकाणी पोर्टेबल कंटेनर केबीनमध्ये आरोग्य दवाखाने सुरू करण्याचे नियोजन आखल्याची माहिती मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी दिली.

# पालघर जिल्ह्यात शालेय विद्यार्थ्यांची धोकादायक वाहतूक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर :** पालघर जिल्ह्यात शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक अत्यंत धोकादायक पद्धतीने होत असून सार्वजनिक वाहतूक आणि खासगी वाहनांची दयनीय अवस्था चिमुकल्यांचा जीव धोक्यात घालत आहे. क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थी कोंबून होणारा प्रवास, खराब वाहने आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पालक वारंवार तक्रारी करत असले तरी पोलीस, एसटी आणि शालेय प्रशासन या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत आहे.

पालघर जिल्ह्यात विद्यार्थ्यांचा घर ते शाळा आणि शाळा ते घर असा दररोजचा प्रवास हा जीवघेणा ठरत आहे. बस, रिक्षा किंवा खासगी व्हॅन असो प्रत्येक वाहनात क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थी कोंबून भरले जातात. तीनचाकी रिक्षा आणि चारचाकी डमडमसारख्या गाड्यांना बंदिस्त दरवाजे नसतात, ज्यामुळे विद्यार्थी एकमेकांच्या मांडीवर बसून किंवा



एकमेकांना धक्काबुक्की करत प्रवास करतात. अशा परिस्थितीत खिडकीतून बाहेर वाकल्यास किंवा तोल गेल्यास अपघाताचा मोठा धोका असतो. पालघर जिल्ह्याला नवीन बसगाड्या मिळाल्या असल्या तरी सार्वजनिक वाहतुकीची दयनीय अवस्था कायम आहे. सफाळे डेपोची एक एसटी बस अत्यंत धोकादायक स्थितीत असून तिची मागील बाजू पूर्णपणे तुटलेली आहे. अशा अवस्थेत ही बस दररोज आगरवाडी शाळेतील विद्यार्थ्यांना घेऊन ये-जा करत आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवाला मोठा धोका निर्माण झाला आहे. उसरणी गावाचे ग्रामपंचायत सदस्य गौरव गावड यांनी या गंभीर प्रकाराची दखल घेत थेट राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे. यावर सफाळे बस स्थानकाचे प्रमुख सनी जोशी यांच्याशी संपर्क साधला असता, 'संबंधित बसची दुरुस्ती करण्यात आली आहे आणि लवकरच इतर जुन्या बसगाड्याही सेवेतून कमी केल्या जातील,' असे आश्वासन दिले आहे.

शालेय वाहतुकीतील या गंभीर त्रुटींकडे शाळा प्रशासन, वाहतूक पोलीस आणि एसटी प्रशासन जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याचा आरोप पालक करत आहेत.

# भिवंडी-कल्याण-शिळफाटा रस्ता अंधारात

## ठेकेदारावर कारवाई करा करा - ठाकरे सेना उपजिल्हाप्रमुख राहुल भगत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी : अत्यंत वर्दळीचा रस्ता म्हणून ओळख असलेल्या भिवंडी-कल्याण-शिळफाटा मार्गावर सध्या अंधाराचे साम्राज्य निर्माण झाले आहे. पलावा पुलापर्यंत गेल्या दोन दिवसांपासून पथदिवे बंद आहेत. त्यामुळे रस्त्यावर ब्लॅकआऊट झाल्याने या मार्गावर अपघात आणि लुटमारीचे प्रकार वाढले आहेत. रस्ता अंधारात गायब झाल्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे.**

भिवंडी-कल्याण-शिळफाटा मार्गाच्या परिसरात गेल्या काही वर्षांत मोठमोठे गृहनिर्माण प्रकल्प उभे राहिले आहेत. नामांकित बांधकाम व्यावसायिकांचे टाऊनशिप या भागात आले आहेत. त्यामुळे नागरीकरण मोठ्या प्रमाणात वाढल्याने हा रस्ता अत्यंत वर्दळीचा ठरला आहे. प्रशासनाकडून या रस्त्याची व्यवस्थित देखभाल आणि दुरुस्ती केली जात नसल्याने वाहनचालक आणि प्रवाशांना नेहमीच मोठा मनस्ताप सहन करावा लागतो. गेल्या दोन महिन्यांपासून हा रस्ता अंधारात गायब झाला आहे. पलावा उड्डाणपुलापर्यंत रस्त्यावरील सर्वच पथदिवे बंद आहेत. परिणामी रात्री वाहन चालवताना वाहनचालकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. पथदिवे बंद असल्यामुळे अपघातांचे आणि लुटमारीचे प्रमाण वाढले असून प्रवाशांच्या सुरक्षेला मोठा धोका निर्माण झाला आहे. भिवंडी-कल्याण-शिळफाटा रस्ता जर डिफेक्ट लायबिलीटी परेडमध्ये येत असले तर नादुरुस्त पथदिव्यांसंदर्भात काम केलेल्या कंत्राटदारावर कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) कल्याण ग्रामीण उपजिल्हाप्रमुख राहुल भगत यांनी केली आहे. हा मार्ग अंधारात गायब झाल्याने वाहनचालक, प्रवासी आणि स्थानिक रहिवाशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे सर्वच पथदिवे तातडीने दुरुस्त करून कार्यान्वित करण्यात यावीत असेही भगत यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे.

# ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या उपाध्यक्ष पदी संतोष तरे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा, ता. २२ (वार्ताहर) :** ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या पंचवार्षिक निवडणूक नुकतीच ठाणे येथील चरईत मोठ्या उत्साहाने पार पडली. निवृत्त सत्र न्यायाधीश दिलीप जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या निवडणुकीत सर्वानुमते टिटवाळा येथील माजी नगरसेवक व उद्योजक संतोष तरे यांची उपाध्यक्षपदी निवड झाली.

तरे यांच्या निवडीने जिल्ह्यातील खेळाडू, क्रीडाप्रेमी व पदाधिकाऱ्यांमध्ये आनंद व्यक्त केला असून, त्यांच्या नेतृत्वाखाली कबड्डी खेळाडूंना अधिक संधी व योग्य दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. तरे म्हणाले,

ही जबाबदारी माझ्यासाठी सन्मानाची असून, मी प्रामाणिकपणे काम करेन. कबड्डीच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक सुविधा व मार्गदर्शन देणे माझे ध्येय आहे. असोसिएशनने तरे यांच्याकडून ठाणे जिल्ह्याचे नाव राज्य व राष्ट्रीय पातळीवर उज्वल होण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A., B.Com., B.Sc. CHEMISTRY, B.Sc. MATHS, BAF, BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. HISTORY

Look forward to a BRIGHTER FUTURE
7038658191
9130580111

# थिराणी विद्यामंदिरात आजी आजोबा दिवस उत्साहात संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** आजी आजोबांच्या प्रती प्रेम, आदरभाव आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील आजी आजोबा दिवसानिमित्त संगीत खुर्ची, मेहंदी काढणे आणि गीतगायन अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून वर्तकनगर, ठाणे येथील श्रीमती सावित्रीदेवी थिराणी विद्यामंदिर येथे शनिवार दिनांक 20 सप्टेबर 2025 रोजी आजी-आजोबा दिवस अतिशय उत्साह पूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमात सुमारे 90 आजी आजोबा उपस्थित होते. काही विद्यार्थ्यांनी आजी- आजोबांबद्दल प्रेम व्यक्त करणारे कार्यक्रम सादर केले. आजी-आजोबांनी वयाचे भान विसरून सर्व संस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेतला. आजी-आजोबांच्या संस्काराच्या शिदोरीवरच आपण उत्तम नागरिक म्हणून चांगले जीवन जगू शकतो असा संदेश आपल्या मार्गदर्शनातून मनोहर पाटील यांनी विद्यार्थ्यांना दिला. तर मुख्याध्यापक पदमसिंग परदेशी यांनी मार्गदर्शनात्मक



भाषणातून आजी आजोबांचा नेहमी आदर करावा व त्यांच्या मार्गदर्शनाखाली वाटचाल करावी असे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

# आदी कर्मयोगी अभियानांतर्गत शेणे येथे मेळावा संपन्न



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** आदिवासी बांधवांचे जीवनमान उंचावून त्यांना स्वावलंबी आणि आत्मनिर्भर बनविण्यासाठी केंद्र सरकारने "धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष" अभियानांतर्गत "आदी कर्मयोगी" उत्तरदायी शासन हा राष्ट्रीय पातळीवरील कार्यक्रम सुरू केला आहे. रायगड जिल्ह्यातील 14 तालुक्यांमधील 113 गावांमध्ये हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राबविला जाणार आहे. यामुळे जिल्ह्यात आदी कर्मयोगी उत्तरदायी शासन कार्यक्रमाला सुरुवात झाली असून पेण तालुक्यातील शेणे आदिवासी वाडी येथे जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळी पेण विधानसभा आमदार रविंद्र पाटील, उपविभागीय अधिकारी पेण, प्रवीण पवार, तहसिलदार तानाजी शेजाळ, गट विकास अधिकारी श्री.लेंडी, सहाय्यक प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे, नायब तहसिलदार श्री. कालेकर, सरपंच, उपसरपंच यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी तसेच आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी श्री.जावळे म्हणाले की, आदि कर्मयोगी अभियानांतर्गत आपल्याला गावाचा विकास आराखडा तयार करायचा आहे. त्या आराखड्याला 2 ऑक्टोबर रोजी आपल्या ग्रामसभेत ठेवून मान्यता घेऊन ती सर्व कामे भविष्यात आपल्याला करायची आहेत. आदिवासी बांधवांसाठी दळी जमिनीचे प्लॉट किमान निश्चिती करण्याच्या सूचना संबंधित विभागाला दिल्या.

जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत जिवंत सातबारा, उत्पन्नाचा दाखला, आधार कार्ड, रहिवासी प्रमाणपत्र दाखल्यांचे वाटप आपण वर्षभर राबवित आहोत. महसूल विभागाचे राजस्व अभियान व ग्रामविकास विभागाचे मुख्यमंत्री पंचायतराज अभियान यांचा उद्देश तळागाळातील आदिवासी बांधवांना सशक्त करणे व गावांचा सर्वांगीण विकास साधणे त्याचप्रमाणे शासनाच्या सर्व योजनांचा लाभ पोहोचविणे हा आहे, असेही ते यावेळी म्हणाले.

यावेळी आमदार रविंद्र पाटील आणि उपविभागीय अधिकारी प्रवीण पवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमादरम्यान जिल्हाधिकारी श्री.जावळे यांच्या हस्ते धरती आबा योजनेंतर्गत दाखल्यांचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी आत्माराम धाबे यांनी केले.

## ठाणे जिल्ह्यातील पडघा येथे
# वित्तीय समावेशन शिबीर संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** भारत सरकारच्या अर्थ मंत्रालय, वित्तीय सेवा विभागातर्फे 1 जुलै ते 30 सप्टेंबर 2025 या कालावधीत देशभरातील ग्रामपंचायतींमध्ये विशेष वित्तीय समावेशन शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत. त्यानुसार, ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील पडघा येथे ठाणे जिल्ह्याची अग्रणी बँक (Lead Bank) असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रच्या वतीने वित्तीय समावेशन शिबिर आयोजित करण्यात आले.

या शिबिराचे औपचारिक उद्घाटन कार्यक्रमाचे मुख्य पाहुणे केंद्रीय अर्थ मंत्रालयातील वित्तीय सेवा विभागाचे संयुक्त सचिव आशिष मोरे यांनी केले.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात श्री.मोरे यांनी प्रधानमंत्री जनधन योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना आणि अटल पेन्शन योजना यांसारख्या महत्त्वाच्या वित्तीय समावेशन योजनांची माहिती दिली आणि नागरिकांना या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन केले. त्यांनी बचत खात्यांचे री-केवायसी (ReKYC) पूर्ण करण्याचे महत्त्व अधोरेखित केले तसेच डिजिटल फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाच्या उपाययोजनांबाबतही मार्गदर्शन केले.

ठाणे जिल्ह्याचे नागरिक व पडघा ग्रामस्थांनी केलेल्या उत्स्फूर्त सहभागाचे श्री. मोरे यांनी कौतुक केले व ही माहिती इतर गावांमध्ये देखील पोहोचवावी असे आवाहन केले.

या कार्यक्रमास रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबईचे मुख्य महाव्यवस्थापक संदीप कुमार, बँक ऑफ महाराष्ट्रचे मुख्य महाव्यवस्थापक दिनकर संकपाळ व, बँक ऑफ बडोदाचे महाव्यवस्थापक सुनीलकुमार शर्मा उपस्थित होते.

या शिबिरात गावकऱ्यांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला व विविध योजनांमध्ये नोंदणी झाली. यामध्ये प्रधानमंत्री जनधन योजनेंतर्गत 269 अर्ज प्राप्त, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेंतर्गत 251 अर्ज प्राप्त, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेंतर्गत 844 अर्ज प्राप्त, अटल पेन्शन योजनेंतर्गत 93 अर्ज प्राप्त, 1 हजार 721 बचत खाती री-केवायसीद्वारे अद्ययावत करण्यात आली, 7 दावे प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेत वितरित, 1 दावा प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेत वितरित, 1 हजार 31 नामनिर्देशन बँक खात्यांमध्ये पूर्ण करण्यात आले.

यावेळी प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना योजनांचे लाभार्थी यांचा सन्मानही करण्यात आला.

या शिबिरात बँक ऑफ महाराष्ट्र, बँक ऑफ बडोदा, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, एचडीएफसी बँक, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., इंडिया पोस्ट पेमेंट्स बँक अशा संस्थांचा सहभाग होता. बँक मित्र (बीसीए) यांच्या साहाय्याने नागरिकांना त्वरित नोंदणी व सेवांचा लाभ घेता आला.

हे शिबिर भारत सरकारच्या वित्तीय समावेशन व ग्रामीण सक्षमीकरणाच्या उद्दिष्टपूर्तीकडे एक महत्त्वाचे पाऊल ठरले.

बँक ऑफ महाराष्ट्रचे विभागीय व्यवस्थापक राजकिशोर रणजीत यांनी आभार प्रदर्शन केले.

## माहुली गड येथे
# प्लास्टिक डिस्पोजल मशीनचे लोकार्पण



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण मधील वीज कंपनी सेवकांच्या सहकारी पतसंस्थेच्या वतीने शहापूर तालुक्यातील माहुली गड येथे प्लास्टिक डिस्पोजल मशीन वनविभागाच्या परवानगीने प्रदूषण कमी करण्याच्या दृष्टीने सामाजिक बांधिलकीतून बसविण्यात आली. त्या मशीनचे उद्घाटन सरचिटणीस कृष्णा भोयर, औदुंबर कोकरे, संयुक्त सचिव दत्तात्रय कांबळे, झोनल अध्यक्ष अशोक बानगुडे, कल्याण परिमंडळ झोनल सचिव संतोष चचाने, वाशी पारेषण झोनल अध्यक्ष सुरेश पवार, केंद्रीय सल्लागार टी.सी. भोईर, पतसंस्था सल्लागार विठ्ठल पाटील, कल्याण निधी प्रमुख अध्यक्ष जी.आर. पाटील, पतसंस्था सचिव बाळकृष्ण महाले, व्यवस्थापक किशोर जयकर, वन विभागाचे वरिष्ठ अधिकारी व पतसंस्थेचे सर्व संचालक यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

# त्र्यंबकेश्वर पत्रकार हल्ल्याचा मुरबाडमध्ये निषेध

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** नाशिक -त्र्यंबकेश्वर येथे पत्रकारांवर झालेल्या भ्याड हल्यातील आरोपींवर पत्रकार सरंक्षण कायद्या अंतर्गत कठोर कारवाई होण्यासाठी आज मुरबाड तालुक्यातील पत्रकारांच्या वतीने या घटनेचा निषेध व्यक्त करून मुरबाड तहसिलदारांना निवेदन देण्यात आले.



दोन दिवसापुर्वी नाशिक -त्रंब्यकेश्वर येथे इलेक्ट्रानिक मिडियाचे पत्रकार साधु महाराजांच्या कार्यक्रमाचे वार्तांकन करण्यासाठी गेले असता तेथिल काही गावगुंडानी त्यांना बेदम मारहाण केली आहे. पत्रकार हा भारतीय लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. प्रत्येक वेळेस आपला जीव धोक्यात घालून समाजाला न्याय देण्याची भुमिका पत्रकार बजावत असतो. भारतीय लोकशाही व्यवस्था जिवंत ठेवण्याचे काम पत्रकार करत आहे. अशा पत्रकारांवर झालेल्या भ्याड हल्याचा मुरबाड तालुक्यातील पत्रकार बांधव जाहीर निषेध केला असून या हल्ल्यातील आरोपींवर पत्रकार सरंक्षण कायद्या नुसार कठोर कारवाई व्हावी,अशी आग्रही मागणी या निवेदनाद्वारे केली आहे.तसेच या निंदनीय घटनेचा आम्ही तीव्र निषेध करत आहोत. आमच्या भावना आणि आमच्या मागण्या शासन दरबारी पोहचवावे अशी मागणी यावेळी उपस्थित पत्रकारांनी केली.यावेळी तहसिलदार अभिजीत देशमुख यांच्या वतीने निवासी नायब तहसीलदार अमोल शिंदे यांनी हे निवेदन स्विकारून तात्काळ जिल्हाधिकारी यांना पाठवण्याचे आश्वासन दिले.

यावेळी दै.लोकदखलचे संपादक चंद्रकांत धनगर, दै.नवाकाळचे जयदीप अढाइंगे, म.राज्य पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष शंकर करडे, तालुका अध्यक्ष दिलीप पवार, सरचिटणीस संजय बोरगे, पत्रकार विशाल चंदणे,सुभाष जाधव,अरूण ठाकरे उपस्थित होते.

# रूखी ज्ञाती शिक्षण समिती तर्फे विद्यार्थ्यांचा गुणगौरव

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** रूखी ज्ञाती शिक्षण समितीच्या वतीने कल्याण मधील सार्वजनिक वाचनालय येथे "विद्यार्थी गुणगौरव समारंभ २०२५" हा सामाजिक उत्सव शनिवारी उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ठाणे जिल्हा प्रमुख सहदेव जेठवा होते. प्रमुख अतिथी म्हणून कल्याण तालुका प्रमुख महेश गोहिल, श्री अंबेनिवास प्रमुख प्रकाश बेरडिया आणि कोनगाव प्रमुख हीरालाल कुंभार उपस्थित होते.

समाजातील मेधावी विद्यार्थी व तरुण व्यावसायिक यांचा विशेष सन्मान करण्यात आला. सन्मानितांमध्ये सिए वंशिका खेदरा, ॲडव्होकेट हितेश गोहिल, मायक्रोबायोलॉजिस्ट तेजस बेरडिया, मेकॅनिकल इंजिनिअर राज बेरडिया, कंप्युटर सायन्स इंजिनिअर जतीन सितापरा, ॲक्सिस बँक उप-प्रबंधक योगेश गोहिल आणि लेखापाल प्रदीप चौहाण यांचा समावेश होता. प्रमुख अतिथींनी विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच समाजसेवा आणि अनुशासनाचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाला समाजातील पदाधिकारी, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रूखी ज्ञाती शिक्षण समितीने सांगितले की अशा गुणगौरव समारंभामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो आणि समाजात शिक्षणाबाबत सकारात्मक वातावरण तयार होते.

# खातिवली येथे वैश्य युवक संघटनेच्या नवरात्रौत्सवाला प्रारंभ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**वाशिंद :** शहापूर तालुक्यातील खातीवली येथे नवंरात्रौत्सवाला मोठ्या भक्तीभावाने सुरवात झाली.दुर्गामातेचे ढोल-ताशाच्या गजरात आगमन झाले.

खातिवली येथे वैश्य युवक संघटनेच्या वतिने हा नवरात्रौत्सव साजरा केला जातो. हा उत्सव 22 संप्टेबर ते 3 आक्टोबर या कालावधीत संपन्न होणार आहे. सोमवार दि. 22 सप्टेंबर रोजी खातीवली येथील श्री. विठ्ठल मंदिरात वैश्य युवक संघटनेचे अध्यक्ष मयुरेश महाजन यांच्या हस्ते गुर्गामातेची प्रतिष्ठापना करण्यात आली. या निमित्ताने दुपारी खातिवली व वाशिंद परीसरातील एकादशी प्रासादिक भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या नऊ दिवसात खुलेगरबा न्रृत्य, पाककला स्पर्धा,



संगीत भजन, हरिपाठ, प्रश्नमंजूषा आणि जय अंबे 1 मिनीट,रांगोळी स्पर्धा, फन्सी ड्रेस स्पर्धा, महिलांसाठी हळदि कुंकू सास्क्रूतीक कार्यक्रम, होम मिनिष्टर, फनसी गरबा न्रृत्य, अशा विविध कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे असी माहिती संघटनेचे उपाध्यक्ष समिर महाजन व पंकज काबाडी यांनी दिली. बुधवार 1 आक्टोबर रोजी रात्री 9.30 वाजता बक्षिस वितरण सभारंभ संपन्न होतार आहे. तर शुक्रवार दि. 3 आक्टोबर रोजी दुपारी 4 वाजता देवीची मिरवणूक व विसर्जन सोहळा संपन्न होणार आहे. या नऊ दिवसात दररोज पहाटे 5.30 वाजता काकड आरती तर दुपारी 12.30 वाजता मध्यान्ह आरती होणार आहे. तर रात्री 8 वाजता आरती व रात्री 12वाजता शेजार आरती केली जाणार आहे. हा उत्सव यशस्वी करण्यासाठी ग्रामस्थांबरोबरच कार्याध्यक्ष योगेश पातकर, कार्याध्यक्ष रितेश भुसारी, सचिव शुभम महाजन, सचिव अल्पेश गंधे, सह सचिव चैत्यन्य, सह सचिव सुशिल काबाडी, व हिशोब तपासणीस जगदिश काबाडी यांनी जय्यत तयारी केली आहे.


# ठाणे जिल्ह्यात चौदा हजार असाक्षरांनी दिली परीक्षा

## नवभारत साक्षरता कार्यक्रमामुळे साक्षर होण्याचे असाक्षरांचे स्वप्न पूर्ण

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** केंद्र शासन पुरस्कृत उल्हास नव भारत साक्षरता कार्यक्रम सन 2022-23 ते सन 2026-27 या कालावधीत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार राज्यात असाक्षरांना साक्षर करण्यासाठी कार्यक्रमाचे अंमलबजावणी केली जात आहे. देशातील 15 वर्ष आणि त्याहून अधिक वयोगटातील निरक्षर व्यक्तींमध्ये पायाभूत साक्षरता (वाचन, लेखन) व संख्याज्ञान विकसीत करुन असाक्षर व्यक्तींना महत्त्वपूर्ण जीवन कौशल्ये विकसीत करावयाची आहेत.

त्या माध्यमातू केंद्र पुरस्कृत उल्लास - नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत शिक्षण विभागाच्या योजना विभागाकडून गेल्या वर्षभरापासून प्रत्येक जिल्ह्यातील असाक्षर व्यक्तींचे सर्वेक्षण करून




त्यांचे साक्षरतेचे वर्ग घेण्यात आले.

रविवार दिनांक 21 सप्टेबर 2025 रोजी राज्यसह सर्व ठाणे जिल्ह्यात असाक्षरांची पायाभूत साक्षरता आणि मूल्यमापन चाचणी मराठी, उर्दू, हिंदी, गुजराती,कन्नड, तेलगु

### असाक्षर व्यक्तींची जीवन कौशल्य विकसीत करण्यासाठी शासनाने उचलले साक्षरतेचे पाऊल

### ठाणे जिल्ह्यातील 80 वर्षाच्या असाक्षर आजीने दिली साक्षरतेसाठी चाचणी परीक्षा

तमिळ, बंगाली या नऊ माध्यमातून घेण्यात आली. या चाचणीसाठी राज्यातील 492532 तर ठाणे जिल्ह्यात 1968 परीक्षा केंद्रावर उल्हास अँपवर नोंदणी केलेल्या 19828 पैकी 14096 असाक्षर परीक्षार्थींनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देत उत्साहात परीक्षा दिली. या परीक्षेसाठी तब्बल 80 वर्ष वयोगटाच्या आजीने सुद्धा साक्षर होण्याचे आपले स्वप्न परीक्षा देऊन साकार केले.

पायाभूत चाचणी ही वाचन, लेखन, आणि संख्याज्ञान अशा तीन भागांसाठी प्रत्येकी 50 प्रमाणे 150 गुणांची ऑफलाईन घेण्यात आली. सदरची परीक्षा ठाणे जिल्हाधिकारी, ठाणे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद ठाणे सर्व शिक्षणाधिकारी, डायट प्राचार्य, गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी यांनी परीक्षा केंद्रांना भेटी देऊन परीक्ष सुरळीत पार पडली. या परीक्षेच्या माध्यमातून असाक्षर व्यक्तीमध्ये विविध जीवन कौशल्य विकसित होतील. असे शिक्षणाधिकारी ( योजना ) भावना राजनोर यांनी सांगितले.




# भाऊसाहेब नेने महाविद्यालयात राज्यस्तरीय चर्चासत्र

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ **पेण** : रायगड जिल्ह्यातील पेण एज्युकेशन सोसायटीचे भाऊसाहेब नेने महाविद्यालयात संगणकशास्त्र विभागाकडून बुधवार, २४/०९/२५ रोजी ' आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) : आव्हाने आणि संधी ' या विषयावरील राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्रासाठी प्रमुख वक्ते म्हणून ओमकार दाभाडकर ( संस्थापक, सीईओ, बूम1, मुंबई), तुषार कुटे (ज्येष्ठ डाटा शास्त्रज्ञ, मुंबई) आणि चेतन टाकसाळे (संचालक, सॉफ्टेक सोल्युशन्स, पुणे) लाभले आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ॲड. श्री. मंगेश नेने भूषविणार आहेत. तसेच या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सदानंद धारप उपस्थित राहणार आहेत. सदर चर्चासत्र हे सर्वांसाठी खुले आहे. सदर चर्चासत्राचे आयोजन महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात येणार असून, संशोधक, विद्यार्थी, प्राध्यापक या सर्वांनी चर्चासत्रात सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजक,प्रा. सौ. पल्लवी आनंद चाटुफळे, संगणक शास्त्र विभाग प्रमुख, यांचेकडून करण्यात आले आहे. त्यासाठी https://forms.gle/oon2yv6ehb4jtu8 या लिंकवर लवकरात लवकर नावनोंदणी करावी.

# स्वराज्य प्रतिष्ठानच्या नवरात्रौत्सवाचा श्री गणेशा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** आज पासून शारदीय नवरात्रौत्सवाला प्रारंभ झाला असून मुरबाड शहरासह संपुर्ण तालुक्यात आज घटस्थापना व दुर्गामातेची ठिक ठिकाणी स्थापना झाली आहे. येणारे नऊ दिवस सर्वत्र धुमधडाक्यात दुर्गादेवीचा जागर असणार आहे.

मुरबाड शहराचे माजी नगराध्यक्ष तथा युवा उद्योजक मोहन आत्माराम सासे यांच्या स्वराज्य प्रतिष्ठानच्या



वतीने मोठ्या जल्लोषात आज माऊलीनगर येथे दुर्गादेवीची स्थापना करण्यात आली असुन पुढील नऊ दिवस या ठिकाणी दांडिया रसिकांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहेत. स्वराज्य प्रतिष्ठानचे यंदाचे 7 वे वर्ष असुन याअगोदर हा उत्सव आपण नगरपंचायत खुले नाट्यगृह येथे आयोजित केला जायचा परंतु काही तांत्रिक कारणामुळे हा नवरात्रौत्सव यावर्षी माऊलीनगर प्रभाग क्रमांक 15 येथे आयोजन केले असुन सर्व दांडिया रसिकांनी दरवर्षी प्रमाणे या सोहळयाचा आनंद घ्यावा असे आवाहन स्वराज्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष मोहन सासे व नगरसेविका मधुरा सासे यांनी केले आहे.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024